JAIRAJ™

*The Legacy of Taste & Goodness*

# समाचार

Vol.: 03




# चेअरमन्स डेस्क

आम्ही एका प्रेरणेने व ध्येयाने पुढे वाटचाल करीत आहोत. जयराज ग्रुप आपलं क्षितीज विस्तारतो आहे, नव्या कल्पना राबवतो आहे, आणि सर्वोच्च गुणवत्तेशी असलेली आपली बांधिलकी जपतो आहे. या वर्षात आम्ही लक्षणीय यश मिळवले. संपूर्ण महाराष्ट्रात आमची विश्वासार्ह खाद्य उत्पादने उपलब्ध असल्याचा प्रचार व प्रसार, आमची व्हॅन ॲक्टिव्हिटी कॅम्पेन करते आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील लोकांना पोषणमूल्य मिळावे यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

डिजिटल आणि जागतिक बाजारपेठेत आम्ही यशस्वी विस्तार केला. इंड्सफूड २०२५ व गल्फफूड दुबई मधील सहभागाने आमचे जागतिक स्थान व सहकार्य अधिक भक्कम झाले. नवीन संधींचे दरवाजे खुले झाले. याशिवाय, युरोपमधील प्रायव्हेट लेबलिंग क्षेत्रात प्रवेश करून आम्ही आंतरराष्ट्रीय वाटचालीत एक महत्त्वाचे पाऊल पुढे टाकले आहे.

बिगबास्केट आणि झेप्टोवर जयराज तांदुळाला उत्तम प्रतिसाद मिळाला. यातून आमच्या ग्राहकांचा आमच्यावर असलेला विश्वास अधोरेखित झाला. श्री. धवल शहा यांचा फोर्ब्स इंडिया 30 अंडर 30 मध्ये समावेश झाल्याबद्दल आम्हाला खूप अभिमान वाटतो. जयराज ग्रुपला प्रगतीपथावर नेणारे त्यांचे नेतृत्व आणि दूरदृष्टी यांचाच हा गौरव आहे.

ही भरभराट होत असताना आमचे ध्येय निश्चित आहे. ते म्हणजे, दर्जेदार गुणवत्तेच्या उत्पादनांद्वारे सकारात्मक योगदान देणे. आमची टीम, पार्टनर्स, आणि ग्राहक, यांच्या सहकार्याने आमचा प्रवास सुरु आहे, यापुढेही अनेक नव्या शक्यता आणि संधी यांचा लाभ आम्ही घेणार आहोत.

श्री. राजेश शहा,
चेअरमन, जयराज ग्रुप



# ताजी बातमी




भारतातील २०२५-२६ च्या

## सर्वाधिक विश्वासार्ह ब्रँडस्

### मध्ये जयराज ग्रुपला मानाचं स्थान

ग्राहक आणि भागधारकांनी जयराज ग्रुपची 'भारतातील सर्वात विश्वसनीय ब्रँडस २०२५-२६'मध्ये निवड केली आहे. २८ मार्च रोजी सहारा स्टार, मुंबई येथे हा सत्कार समारंभ झाला. हे यश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, एक व्यापक मीडिया कॅंपेन आखण्यात आली होती. याद्वारे संपूर्ण इंडिया टुडे (टेलिव्हिजन पार्टनर) व बिझनेस स्टॅंडर्डसह सर्व आघाडीच्या डिजिटल व प्रिंट माध्यमांमध्ये जयराज ग्रुपला स्थान मिळाले.

वारसा, कल्पकता यांसाठी नामवंत असलेल्या आणि उद्योग क्षेत्राचे नेतृत्व करणाऱ्या, काही अत्यंत प्रतिष्ठित ब्रँडसह निवड होणे हा एक अतुलनीय अनुभव होता. टाटा, रिलायन्स, डाबर, हायर, महिंद्रा, टीव्हीएस, पिरामल फार्मा, एलआयसी, हेटीश आणि रॅंकोल्ड यांच्या सारख्या ब्रँडस सोबत जयराजच्या नावाचा समावेश झाला. यामुळे आमच्या उत्कृष्ट गुणवत्तेला व प्रगतीला प्रेरणा मिळाली. सहकार्याच्या नव्या वाटा खुल्या झाल्या व उद्योग क्षेत्रातील दिग्गजांच्या बरोबरीने स्थान मिळाले.






## महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोषक आहाराविषयी जागृती

### जयराजच्या व्हॅन ॲक्टिव्हिटी मोहीमेचा प्रारंभ

संपूर्ण महाराष्ट्राला दर्जेदार किराणा उपलब्ध करून देण्यासाठी जयराज ग्रुपने, व्हॅन ॲक्टिव्हिटी कॅम्पेन या ग्रामीण उपक्रमाची सुरुवात केली. तांदूळ, डाळ आणि कडधान्यांसह अत्यावश्यक अन्नपदार्थांचा तसेच पौष्टिक सुपरफूडचा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात प्रचार करणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. यामुळे जयराजच्या सोयीस्कर, दर्जेदार, आणि पोषक उत्पादनांबद्दल ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण झाली व होत आहे. पुण्यातील बस स्थानके आणि बसवरील प्रभावी ब्रँडिंगमुळे जयराजला संपूर्ण शहरात लक्षवेधी प्रसिद्धी मिळाली.























# इंड्सफूड २०२५ मध्ये जयराज ब्रँडला अतुलनीय प्रतिसाद!

## गौरवशाली वाटचाल सुरु!

INDUS:FOOD
Source. Process. Collaborate.

दि. ८ ते १० जानेवारी २०२५ दरम्यान इंडिया एक्सपोझिशन मार्ट, ग्रेटर नोएडा, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या, आशियातील प्रीमियर फूड अँड बेव्हरेजेस (F&B) ट्रेड शो, इंड्सफूड २०२५ मध्ये जयराज ग्रुप सहभागी झाला. या वर्षी, आम्ही धान्ये, डाळी आणि मसाल्यांची प्रीमियम श्रेणी, आणि जागतिक बाजारपेठेच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी निर्माण केलेल्या आमच्या प्रायव्हेट लेबलिंग सेवा, सादर केल्या. याला उत्तम प्रतिसाद मिळाला. जगभरातील खरेदीदारांशी आम्ही अर्थपूर्ण आणि उत्साहवर्धक गाठीभेटी आणि संवाद साधला.












# जागतिक ट्रेंड्स, नावीन्यपूर्ण कल्पना व संधींचा शोध

### श्री धवल शहा यांची गल्फफूडला उपस्थिती

आमचे सन्माननीय डायरेक्टर, श्री धवल शहा हे दुबई येथे आयोजित केलेल्या गल्फफूड एक्स्पो या जगातील सर्वात मोठ्या वार्षिक अन्न आणि पेय (F&B) प्रदर्शनात सहभागी झाले.  या वर्षीच्या गल्फफूड एक्स्पो मध्ये, ग्राहकांच्या आवडीनिवडी, पुरवठा साखळीतील प्रगती व आंतरराष्ट्रीय खाद्य व्यापारातील उदयोन्मुख संधी याविषयी अद्ययावत माहिती मिळाली.

रशियाचे कृषी मंत्री एच. ई. ओक्साना लट, आणि भारताचे अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री श्री. चिराग पासवान, यांसारख्या मान्यवरांना भेटण्याचा मान त्यांना लाभला.  नवीन सहकारी जोडणे, बाजारपेठेतील बदलते प्रवाह जाणून घेणे, भागीदारी मजबूत करणे आणि जयराजचे नेतृत्व सक्षम करण्याची ही एक उत्तम संधी श्री धवल यांना मिळाली.













# युरोपमध्ये जयराजच्या प्रायव्हेट लेबलिंगचे क्षितिज विस्तारते आहे.

### जागतिक ब्रँड्ससाठी सर्वोत्तम दर्जा आणि कस्टमायझेशन

युरोपमध्ये दर्जेदार प्रायव्हेट लेबलिंग सेवा देण्याच्या दृष्टीने जयराज ग्रुपने महत्वाचे पाऊल उचलले. विश्वासू भागीदाराच्या शोधात असलेल्या ब्रँड्सना, ७५ वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवासह सर्वोत्कृष्ट गुणवत्ता, कस्टमायझेशन,आणि विश्वासार्हता देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. आमच्या या विस्तारामुळे युरोपमधील ब्रँड्सना, आमची खाद्यक्षेत्रातील गुणवत्ता वापरून स्वत:ची  यशस्वी उत्पादनश्रेणी विकसित करण्याची संधी मिळणार आहे. याशिवाय, नॉर्वे मध्येही आम्ही जयराज ब्रँडचे भक्कम स्थान निर्माण केले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जागतिक दर्जाची उत्पादने सादर करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

## जयराज तांदूळ आता बिगबास्केटवर उपलब्ध
## अस्सल पारंपरिक चव एका चुटकीसरशी हातात!

प्रत्येक कुटुंबाला दर्जेदार तांदूळ मिळावा यासाठी आम्ही दक्ष असतो, आणि ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आमच्या यशावर शिक्कामोर्तब करतो. आम्ही आमचे कार्यक्षेत्र विस्तारून अस्सल स्थानिक तांदुळाचे विविध प्रकार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी काम उत्साहाने करीत आहोत. सुगंधित आंबेमोहर, स्वादिष्ट इंद्रायणी, टपोरा कोलम आणि पचायला हलका सोना मसूरी, ही जयराजची उत्पादने आता बिगबास्केटवर उपलब्ध आहेत. प्रत्येकाच्या आवडीनिवडीसाठी व गरजेनुसार परिपूर्ण धान्य प्रकार जयराजकडे आहे. सोयीस्कर ऑनलाइन शॉपिंगच्या सुविधेसह पारंपरिक चवीचा सुखकर आस्वाद घेण्याची ही संधी आहे!







## पुणे, मुंबई आणि नाशिकला जलद आणि आनंददायी सेवा

### जयराज किराणा आता झेप्टोवर

ई-कॉमर्सने खरेदी क्षेत्रात क्रांती आणली, आपण सगळेच आज या लाटेवर स्वार आहोत. अमेझॉन आणि फ्लिपकार्टवरच्या यशस्वी पदार्पणानंतर आमचा किराणा आता झेप्टोवर उपलब्ध आहे. उत्तम दर्जाचा तांदूळ, डाळी व इतर खाद्यपदार्थ आता अधिकाधिक लोकांना घरपोच मिळणार आहेत. एका पुणेस्थित ब्रँडपासून ते मुंबई व नाशिकच्या घराघरात पोहोचण्यापर्यंतच्या प्रवासात, आमच्या ग्राहकांचा विश्वासच आम्हाला उत्कृष्ट सेवा देण्याची प्रेरणा देतो.

# आनंदाचा प्रकाश उजळला!

## दिवाळी भेटींचे वाटप

जयराज ग्रुपचा पाया असलेल्या वितरक आणि डिलर्सना आम्ही दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे दिवाळीच्या सप्रेम भेटी दिल्या. उत्सवाच्या निमित्ताने आमचं मैत्रीचं आणि विश्वासाचं नातं आणखी दृढ झालं. यामुळेच आमचा पुढचा मार्ग प्रकाशमान होणार असल्याचा आम्हाला विश्वास आहे.














# सीएसआर उपक्रम

## जयराज ग्रुपचे गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी योगदान

जयराज ग्रुपने, अध्यक्ष श्री. राजेश शहा यांच्या नेतृत्वाखाली, गंगाधाम-कोंढवा रोड येथे जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संकुलाच्या विकासात योगदान दिले आहे.पीकेजीएम विद्याधाम, या जून महिन्यात उद्घाटन झालेल्या सीबीएसई शाळेत 10 मजली इमारत, बॅगलेस शिक्षण प्रणाली, डे बोर्डिंग सुविधा, अद्ययावत ग्रंथालय, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग रूम, तीन मजली पार्किंग, विज्ञान आणि संगणक प्रयोगशाळा अशा अनेक सुविधा आहेत. जयराज ग्रुप आणि हे अत्याधुनिक गुरुकुल जिथे पहिल्याच वर्षी 900 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला, भावी पिढ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहेत.





## जयराज स्पोर्ट्स आणि कन्व्हेन्शन सेंटर – खेळ व मनोरंजनासाठी एक उत्कृष्ट केंद्र

समाजसेवेत सक्रिय असलेल्या श्री पूना गुजराती बंधू समाजाने उभारलेले जयराज स्पोर्ट्स आणि कन्व्हेन्शन सेंटर हे एक प्रीमियम क्रीडा आणि मनोरंजन केंद्र आहे. महा-गुजरात स्पोर्ट्स अँड रिक्रिएशन फाउंडेशनच्या अंतर्गत, जागतिक दर्जाच्या क्रीडा, मनोरंजन आणि कौशल्य विकासाचा उत्कृष्ट संगम असलेला उत्तम क्लब बनण्याचे सेंटरचे ध्येय आहे. दिवसभर चालणारे कॅफे, बिलियर्ड्स रूम, मिनी थिएटर, व्यायामशाळा, स्पा, स्विमिंग पूल, बॅडमिंटन आणि टेनिस कोर्ट, क्रिकेट पीच व इतर अनेक अत्याधुनिक सुविधांनी हे सेंटर नटले आहे.

# नेतृत्वाचा सन्मान, गुणवत्तेचा अभिमान!

### जयराज ग्रुपचे डायरेक्टर श्री. धवल शहा यांना ईटी बिझनेसमन ऑफ द इयर पुरस्कार प्रदान

जयराज ग्रुपचे डायरेक्टर श्री. धवल शहा यांना टाइम्स समूहातर्फे प्रतिष्ठित ईटी बिझनेसमन ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, जयराज समूह प्रायव्हेट लेबलिंगमध्ये विश्वासार्ह नाव म्हणून जागतिक स्तरावर प्रगती करत आहे. ईटी बिझनेसमन ऑफ द इयर पुरस्कार हा त्यांच्या यशोगाथेचा सार्थ सन्मान आहे.









Forbes

30 UNDER 30




# जयराज ग्रुपच्या वारसा पुढे नेणारा अनमोल क्षण

### श्री. धवल शहा फोर्ब्स इंडिया 30 अंडर 30 मध्ये समाविष्ट

जयराज ग्रुपचे डायरेक्टर श्री. धवल शहा यांना फोर्ब्स इंडिया 30 अंडर 30 मासिकामध्ये स्थान देण्यात आले आहे. यामुळे त्यांचे नेतृत्व, दूरदृष्टी व या उद्योगातील प्रभावी कामगिरी यांना प्रतिष्ठा लाभली आहे. संपूर्ण जयराज टीम आणि कुटुंबासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे! हे यश केवळ वैयक्तिक नाही तर खाद्यउद्योगातील उत्कृष्टतेसाठी आम्ही जे सातत्यपूर्ण प्रयत्न साधतो, त्यांचेच जणू प्रतिबिंब आहे.

# पुरस्कार व सन्मान

## यशाचा सर्वोच्च आविष्कार!

### श्री राजेश शहा यांना कॅलिफोर्निया पब्लिक युनिव्हर्सिटी, यूएसए कडून पीएच.डी. प्रदान.

जयराज ग्रुपचे चेअरमन श्री. राजेश शहा, यांना कॅलिफोर्निया पब्लिक युनिव्हर्सिटी, यूएसए द्वारे सामाजिक उद्योजकतेमध्ये डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) ही पदवी प्रदान करण्यात आली. समाजात उत्कर्ष व सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या त्यांच्या प्रेरणेचे व कृतिशीलतेचे हे प्रतीक आहे. जयराज ग्रुपची मूल्ये आणि वारसा जपतानाच, लोकांच्या जीवनात योगदान देणे यातच खरे यश आहे, हे त्यांनी सिद्ध केले आहे. जयराज टीम तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!











**RAJESH SHAH**
CHAIRMAN, JAIRAJ GROUP







## ध्येयनिष्ठ नेतृत्वाचा गौरव

### जयराज ग्रुपचे चेअरमन श्री. राजेश शहा यांना त्यांच्या समाजकार्यासाठी प्रतिष्ठित समाज रत्न पुरस्कार प्राप्त

आमचे चेअरमन श्री. राजेश शहा यांना मुंबईतील फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (FAM) तर्फे राज्याचे कॅबिनेट मंत्री श्री सुनील सिंघीजी यांच्या हस्ते समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. खरे यश हे समाजऋणाची परतफेड करण्यात, व आपले लोक, मूल्यं, आणि ध्येय यांचा आदर करणारी कंपनी स्थापन करण्यात असते, हा त्यांचा विश्वास आहे. या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने त्यांचा विश्वास सार्थ झाला आहे.

JAIRAJ™
*The Legacy of Taste & Goodness*

पत्ता:
जयराज आणि कंपनी
५३०-३१, गेट क्र. ५, मार्केट यार्ड,
गुलटेकडी, पुणे-४११०३७, महाराष्ट्र, भारत

व्यापारविषयक चौकशीसाठी संपर्क: 020-24270440/1/2
किंवा ईमेल: enquiry.jairaj@gmail.com

आम्हाला सोशल मीडियावर फॉलो करण्यासाठी स्कॅन करा
ऑनलाईन खरेदीसाठी स्कॅन करा

आम्हाला फॉलो करा The Jairaj Group jairajgroup jairajindia jairajgroup